| अ. क्र. | लक्षवेधी | विभागाचे नाव |
|---|---|---|
| 1. | "तारापूर एमआयडीसी व बोईसर परिसरात गत 15 दिवसापासून सुरु असलेले आगीचे सत्र, बोईसर अवधनगर येथील अवैध भंगार व्यवसाय करणाऱ्या गोडाऊनला लागलेल्या आगीत आजूबाजूचे 100 गोडाऊन भस्मसात पडणे, भंगार व्यावसाईक, लोखंडी वस्तू कापण्यासाठी करत असलेला गॅस कटिंगचा वापर, त्यासाठी लागणाऱ्या ऑक्सिजन व गॅस सिलींडरचे साठे, त्यांचा झालेला स्फोट, आगीची तीव्रता इतकी होती की, अग्निशमन दलाचे आठ बंब घटनास्थळी रात्रभर आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करुनही आग आटोक्यात न येणे, महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे शासकीय जागेवर सुरु असलेले अवैध भंगाराचे व्यवसायात, भंगार व्यवसायिकांनी कपड्यांची चिंधी, केमिकलने भरलेले ड्रम, लोखंडी पाईप, स्फोटक रासायनिक वस्तू याची बेकायदेशीर साठवण, शॉफ टेक्सटाईल्स या कंपनीने अनधिकृतरित्या कोणतीही सुरक्षेची काळजी न घेता ठेवलेली 20 टन एलपीजीची गॅस टाकी, सदर टाकीच्या बाजूला असलेला स्फोटक व ज्वलनशील पदार्थाचा साठा, असलेली गोडावून, परिणामी आजूबाजूच्या लोकवस्तीला निर्माण झालेला धोका, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | गृह विभाग |
| 2. | "राज्यात इयत्ता आठवीपर्यंत पुढच्या वर्गात ढकलण्यात आलेले विद्यार्थी इयत्ता नववीत गेल्यानंतर अनुत्तीर्ण होणे, राज्यातील शाळा, विद्यार्थी संख्या, शिक्षक यांची युडाएस या प्रणालीकडून करण्यात आलेल्या पहाणीत माहे नोव्हेंबर, 2016 मध्ये नवीत अडीच लाख मुले अनुत्तीर्ण झाल्याची बाब उघडकीस येणे तर दहावी नंतर लाखो विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून बाहेर गेल्याची माहे नोव्हेंबर, 2016 मध्ये उघडकीस येणे, उच्च शिक्षणापर्यंत पोहचवणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षण, विभागाकडून होत असलेल्या प्रयत्नांना आलेले अपयश, शिक्षणातील वाढत चाललेल्या गळतीचे वास्तव्य यूडाएसच्या (युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्यूकेशन) माहे नोव्हेंबर, 2016 | शालेय शिक्षण विभाग |

| | | |
|---|---|---|
| | मध्ये प्रसिध्द झालेल्या आकडेवारी वरुन स्पष्ट होणे, सन 2015-16 या शैक्षणिक वर्षात दहावीच्या वर्गात असलेल्या 17 लाख 27 हजार 559 विद्यार्थ्यांपैकी 11 लाख 70 हजर विद्यार्थ्यांना 11 वीच्या वर्गात प्रवेश घेणे, 70 हजार 405 विद्यार्थी अभियांत्रिकी तर 1 लाख 13 हजार विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत 10 हजार 643 शेतकी पदविका अभ्यासक्रमात प्रवेश घेऊन शिकत असले तरी दोन लाख 39 हजार विद्यार्थी हे दहावीला उत्तीर्ण होऊनही त्यांनी अकरावीला कुठेही प्रवेश घेतला नसल्याची बाब उघडकीस येणे, याप्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| 3. | राज्यातील विविध भागांमध्ये कुपोषणामुळे बालकांचा मृत्यू होत असल्याच्या अनेक घटना निदर्शनास येणे, तसेच राष्ट्रीय कुटुंब कल्याण आरोग्य सर्वेक्षणामध्ये राज्यातील पाच वर्षाखालील ३६ टक्के मुलांचे वजन व उंची निर्देशाकांपेक्षा कमी असल्याची निदर्शनास येणे, त्यातच काही भागामध्ये सरकारने पोषण आहार योजना चालू करूनही सरकारी यंत्रणेच्या सुस्ततेमुळे बालकांपर्यंत पोहचत नसल्याचे निदर्शनास येणे, अलीकडच्या काळामध्ये मुंबई, मानखुर्द येथील बालसुधारगृहात दीड महिन्याच्या कालावधीत ६ अल्पवयीन बालकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास येणे, सदर सुधारगृहातील मुलांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट न होणे, त्यामुळे बालकांना कुपोषणा पासून रोखण्याकरिता राज्य शासनाची पोषण आहार योजना अधिक काटेकोर व प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता तसेच बालकांच्या आरोग्य विषयक तपासणी औषधोपचार पुरवून राज्यातील बालसुधार गृहासाठी सोयीसुविधा पुरविण्याकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | महला व बालविकास विभाग |
| 4. | `राज्य शासनाने ऑनलाईनदवारे सातबारा उतारे देण्याची केलेली घोषणा, परंतु ऑनलाईन सातबारा आणि ई | महसूल विभाग |

| | | |
|---|---|---|
| | फेरफारसाठी आवश्यक असलेली यंत्रणा कुचकामी ठरत असल्यामुळे गत सहा महिन्याच्या कालावधीत तिस-यांदा तलाठयांना आंदोलन करावे लागणे, शासनाने सुरु केलेल्या ऑनलाईन यंत्रणेतील बिघाड अद्याप दुरुस्त झालेला नसल्याने ब-याच गैरसोयी होणे, परिणामी एकीकडे हस्तलिखित सातबारा उतारे बंद झाले आणि ऑनलाईनमध्ये असलेल्या त्रुटीमुळे त्यावरही दाखले देता येत नसणे, अशा दुहेरी संकटात तलाठी, मंडल अधिकारी तसेच शेतकरी सापडणे, याबाबत शासनाकडे वारंवार दिलेली निवेदने, या संदर्भात तत्कालिन महसूल मंत्री यांच्यासोबत दि. २८ व २९. एप्रिल, २०१६ रोजीच्या सुमारास झालेल्या बैठकीत दि.३१.१०.२०१६ पूर्वी सजांची निर्मिती करण्याचे दिलेले आश्वासन , या आश्वासनाची अद्यापपर्यंत न केलेली पूर्तता, शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता शासनाने या तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका .'' | |
| 5. | दगडखाणीतील गोरगरिब आणि वंचित घटकांच्या मुलांसाठी शैक्षणिक व्यासपीठ ठरलेल्या पाषाण शाळा शासनाने बंद केल्याचे माहे नोव्हेंबर, 2016 मध्ये उघडकीस येणे, शासनाच्या या निर्णयामुळे राज्यभरातील पाषाण शाळांमधील तब्बल तीस हजार विद्यार्थी रस्त्यावर येणे, त्याचबरोबर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर कोळसलेली बेकारीची कुऱ्हाड, वंचित घटकातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर फेकले जाण्याची निर्माण झालेली भिती, शासनाच्या या निर्णयाचा निषेध करण्यासाठी पालकांसह विद्यार्थ्यांनी बेमुदत धं्रणे आंदालन करण्याचा दिलेला इशारा, दगडखाण कामगार वारंवार विस्थापित होत असल्याने त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्याने त्यांच्या भवितव्याचा निर्माण झालेला भिषण प्रश्नाची दखल घेऊन 'संतुलन' या सामाजिक संस्थेने 1997 मध्ये हवेली (जि.पुणे) तालुक्यातील वाघोली गावी सुरु केलेली शाळा, सदर शाळेस | शालेय शिक्षण विभाग |

| | | |
|---|---|---|
| | कायमस्वरुपी मान्यता देण्यासाठी सन 2012 मध्ये शिक्षण सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितांची चार वर्षाच्या कालावधीत एकही बैठक न होता शाळा बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याबाबतचा अहवाल सादर केल्याने, याप्रकरणी शिक्षण विभागाने कोणतीही खातरजमा न करता, शाळा बंद करण्याचा घेतलेला निर्णय, परिणामी 30 हजार विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | |
| 6. | "राज्य शासनाने कृषी विभागाच्या संशोधन व विस्तार कार्याशी निगडीत असणाऱ्या 26 योजना बंद करण्यात आल्याची बाब नोव्हेंबर, 2016 मध्ये निदर्शनास येणे, राज्य व जिल्हा पातळीवर समान असणाऱ्या योजना रद्द करुन त्या अन्य कृषी योजनांमध्ये समाविष्ट करुन योजना कमी करण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले असले तरी त्याबाबतची शासनाची भूमिका स्पष्ट नसणे, केंद्र शासनाने या अगोदरच राज्याला विविध कृषी योजनातंर्गत दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये 13 हजार कोटी रुपयांची करण्यात आलेली कपात, नॅशनल हॉर्टीकल्चर मिशन (एनएचएम) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभासाठीच्या योजना अपुऱ्या निधीअभावी बंद करणे, त्याप्रकारे राज्य शासनानेही कृषी विकासाच्या योजना बंद करण्याची स्वीकारलेली भूमिका, कृषी संशोधन व विस्तार हा कृषी विकासाचा मुख्य पाया असताना, त्याद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजना, या कृषी विकासाला बळकटी देणाऱ्या असल्याने त्याद्वारे कृषी क्षेत्रामध्ये घडून येणाऱ्या शाश्वत प्रगतीला या योजना बंद केल्यामुळे बसणारी खिळ, परिणामी कृषी क्षेत्राचे होणारे नुकसान, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कृषि विभाग |
| 7. | ता.खामगाव, (जि.बुलढाणा) पाळा येथील स्वनिबाजी कोकरे आदिवासी आश्रमशाळेत अत्याचार होत असल्याची बातमी आई-वडिलांना सांगितल्यानंतर दि.3 नोव्हेंबर, 2016 रोजी सदरहू आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलींवर सामुहिक | आदिवासी विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | अत्याचार वारंवार केले जात असल्याची खळबळजनक घटना समोर येणे, यापूर्वी विद्यार्थीनीनी लैगिंक शोषण होत असल्याच्या तक्रारी सदरहू आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांच्या निदर्शनांस आणून दिले असता मुख्याध्यापकांनी दखल न घेणे, मुख्य संशयीत इत्तुसिंह पवार यांनी सदरहू विद्यार्थीनीवर विविध प्रकारे दहशत निर्माण करून अमानुषरित्या लैगिंक शोषण केल्याचेही उघडकीस येणे, सदरहू आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांनी सामुहिक अत्याचार सर्रासपणे होत असताना घेतलेली बघ्याची भूमिका यामुळे आश्रमशाळेत शिकणाऱ्या गोरगरीब समाजातील विद्यार्थीनीच्या सुरक्षतेची निर्माण झालेली गंभीर समस्या, यापूर्वीही यवतमाळ येथील यवतमाळ पब्लिक स्कूल मध्येही काही महिन्यांपूर्वी अशाप्रकारे घडना घटल्यानंतरही शासनाने कोणतेही ठोस कारवाई न करणे, दुरावस्था असूनही तीन एक हजार रूपयांत मिळणारे अनुकुल अहवाल आणि असहाय्यतेमुळेच येथे राहणारी मुले,मुली हे दुष्चक्र शिक्षणाचे नसून शोषणाचेच असल्याची परिस्थिती खामगाव आश्रमशाळेत घडलेल्या लैगिंक शोषणानंतर शासनाने तातडीने सदरहू आश्रमशाळेची मान्यता रद्द केल्यामुळे व त्या शाळेतील विद्याथ्र्याचे अद्याप समायोजन करण्यात आलेले नसल्याने 388 विद्याथ्र्यांचे शैक्षणिक भवित्वय धोक्यात येण्याची निर्माण झालेली परिस्थिती, शासनाने याप्रकरणी त्वरीत ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ” | |
| 8. | प्रादेशीक मनोरूग्णालय, नागपूर येथे २० मनोरूग्णांचा मृत्यू झाल्याचे नुकतेच निदर्शनास येणे मनोरूग्णालय प्रशासनाकडून रूग्णांना योग्य उपचार न मिळणे, रूग्णांचे हातपाय बांधून सामान्य रूग्णांचा कक्षामध्ये रूग्णांना ठेवले जात असणे, आवश्यक असणाऱ्या औषधीचा तुटवडा रूग्णालयात असणे, या संदर्भाने रूग्णांच्या नातेवाईकांनी वैद्यकिय अधिक्षक, मनोरूग्णालय, नागपूर यांच्याकडे केलेली तक्रार, चतूर्थ श्रेणी कर्मचारी रूग्णांना मारपीट करीत | सार्वजनिक आरोग्य व कुंटुब कल्याण विभाग |

| | | |
|---|---|---|
| | असल्याचा निर्माण झालेल्या संशय, मनोरूग्णालय, नागपूर श्री. मनोहर आहूजा यांच्या संशयस्पद मृत्यू च्या प्रकरणी आरोग्य विभागाच्या सहा. संचालक यांनी गंभीर दखल घेतली असणे, मृतकाचा शरीरावर जखमा असल्याचे शवविच्छेदन अहवालात नमुद असणे, मंगळवार दि. २५ ऑक्टोंबर २०१६ रोजी मृत्यू झालेल्या मनोरूग्णांचा तहसिलदार अभावी शवविच्छेदन प्रक्रिया गुरूवार दि. २७ ऑक्टों. २०१६ ला करणे, राज्यातील पूर्व विदर्भात असलेले एकमेव मनोरूग्णालयाची झालेली अंत्यत बिकट अवस्था, तसेच औषधी तुटवडा असणे, कर्मचारी बेजवाबदारपणाने वागत असणे, अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मनोरूग्णालय प्रशासनाकडुन होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे मनोरूग्णांचा नातेवाईकामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. | |
| 9. | मानखुर्द, मुंबई येथील द चिल्ड्रेन्स एड सोसायटी च्या शासकीय बालगृहात एका महिलेसह इतर पाच गतिमंद मुलांचा मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, 2016 मध्ये व त्या दरम्यान निर्दशनास येणे, मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या गतिमंद बालगृहात गत दीड महिन्यात झालेल्या गतिमंद मुलांच्या मृत्यूला महिला व बालकल्याण विभागाची अनास्था कारणीभूत असणे, मुंबई सारख्या शहरातील गतीमंद बालकांच्या वसतीगृहाची अस्वस्था भीषण असून या मुलांना कोठडीत ठेवल्यासारखे चित्रा असणे, या मुलांना औषधांची मोठ्या प्रमाणात गरज असताना त्यांना शासनाकडून पुरेशी औषधे पुरवली जात नसणे, गतिमंद मुलांच्या आरोग्यांची तपासणी बीएएमएस डॉक्टरांकडून करण्यात येत असणे, गतिमंद मुलांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आलेली नसणे, कर्मचारी वर्ग अपुरा असून मुलांची परिस्थिती भयावह असणे, शासनाकडून अत्यंत अल्प निधी द चिल्ड्रेन्स एड सोसायटी देण्यात येत असणे, राज्यशासनाने या गंभीर प्रश्नांबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रीया. | महिला व बालविकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| 10. | "ठाणे जिल्ह्यासाठी स्थापन झालेल्या वसई उपप्रादेशिक (**RTO**) परिवहन कार्यालयाची हद्द भाईंदर ते तलासरी पर्यंत असणे. परंतू वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा व तलासरी हे संपुर्णत: आदिवासी बहुल असलेल्या तालुक्यांना ठाणे परिहवन कार्यालयाशी संलग्न ठेवल्याने त्यांचा त्रास कमी झालेला नसुन उलट या आदिवासी भागातील जनतेवर अन्याय होत असल्याची निर्माण झालेली भावना. वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा व तलासरी ते ठाणे हे 150 ते 200 कि.मी. चे अंतर पार करुन ठाणे येथील परिवहन कार्यालयात जाऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी अनेक त्रासदायक अडचणींना सामोरे जावे लागत असून त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असणे, या आदिवासी बहुल तालुक्यातील सोयीसाठी या तालुक्यांचा संबंध विरार परिवहन कार्यालयाशी संलग्न केल्यास परिवहन कार्यालयातील कामे करण्यास खुप सोईचे होईल तसेच विरार उपप्रादेशिक परिवहन कार्यालये हे मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असल्याने येथे येणे-जाणे खुप सोईचे होईल याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा व तलासरी हे 5 संपुण्रत: आदिवासी तालुके विरार उपप्रोदशिक परिवहन कार्यालयास जोडण्याबाबतची मागणी दि. 1/8/2011 व 15/05/2015 रोजीच्या निवेदनाद्वारे मा. परिवहन मंत्री व शासनाकडे पाठपुरावा करुनही या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष जनतेत पसरलेले तिव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. " | गृह (परिवहन) विभाग |
| 11. | राज्यातील नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, औरंगाबाद, नाशिक नगर आणि ठाणे या दहा जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई - नागपूर समृध्दी कम्युनिकेशन एक्सप्रेसवेसाठी शेतकऱ्यांच्या परंपरागत जमिनीचे संपादन करण्याचे काम सुरु करण्यात येणे, ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी या प्रकल्पासाठी जमिनी देण्यास स्पष्ट नकार देत मोठ्या प्रमाणात विरोध केल्याचे माहे | सार्वजनिक बांधकाम (उपक्रम वगळून) विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सप्टेंबर, 2016 च्यासुमारास निदर्शनास येणे, मुंबई-नागपूर टोलमुक्त प्रवास देणाऱ्या समृध्द महामार्ग योजनेला शहापूर, भिवंडी येथील गावकऱ्यांनी केलेला विरोध इतर प्रकल्पाप्रमाणेचे समृध्द महामार्ग योजनेत शेतकरी विस्थापित होण्याची निर्माण झालेली शक्यता, शासनाने कोणत्याही प्रकारची माहिती देण्याऐवजी थेट जमिनींचे संपादन प्रक्रिया सुरु केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही मोबदला मिळत नसल्याने शासनाकडून बळजबरीने जमिनी संपादनेच्या प्रक्रियेला राज्यातील सदरील योजनेमध्ये जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी देण्यास शेतकरी विरोध करीत असल्याने सदरील समृध्दी मुंबई-नागपूर 712 किलोमीटरची आठ पदरी रस्त्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्प रखडण्याचा प्रश्न निर्माण होणे, राज्यशासनाने समृध्दी महामार्गाबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया. | |
| 12. | पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील सातारा ते पुणे दरम्यानच्या महामार्गाच्या सहा पदरी करणाचे काम अतिशय संथगतीने व निकृष्ट दर्जाचे होत असून सदर काम करण्याऱ्या रिलायन्य या कंपनीने अनेक नियमांचे उल्लंघन केल्याने या कंपनी विरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी पुणे विभागात आयोजित केलेल्या बैठकीत, स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी कैंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांचेकडे दि. 17 ऑगस्ट, 2016 रोजी वा त्या सुमारास केल्यानंतरही अद्यापी या कंपनी विरोधात कोणतीच कारवाई करण्यात न येणे, या महामार्गावरुन दररोज प्रवासकरणाऱ्या शेकडो वाहनचालक व प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, सदर बैठकीमध्ये कैंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री यांनी राज्य शासनाच्या संबंधीत मंत्री व अधिकाऱ्यांना संबंधीत कंपनी विरोधात तातडीने कारवाई करुन नोटीस देण्याबाबत स्पष्ट निर्देश देऊनही अद्यापी संबंधीत कंपनी विरोधात कोणतीच कारवाई न होणे, सदर कंपनीद्वारे गत 4-5 वर्षापासून या रस्त्याच्या सहा पदरी करणाचे काम सुरु | सार्वजनिक बांधकाम (उपक्रम वगळून) विभाग |

| | | |
|---|---|---|
| | असताना रोज लाखो प्रवाशांची गैरसोय होत असतानाही, कंपनीकडून जादा दराने होत असलेली टोल वसुली, यामुळे जनतेच्याच पैशातून सदर कंपनी विकासाचे काम करीत असल्याने यां कंपनीने राज्य शासनाबरोबर केलेल्या करारातील असंख्य अटींचा भंग करुनही होत असलेले दुर्लक्ष परिणामी महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशी व वाहनचालकांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | |
| 13. | "शहापूर आदिवासी विकास प्रकलपाअंतर्गत असलेल्या मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) माळ आश्रमशाळेतील 23 विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची दि. 17 ऑक्टो. 2016 रोजी घडलेली घटना, विद्यार्थ्यांना टोकावडे येथील ग्रामीण रुग्णालयांसह शिरोशी आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून यात 18 मुली व 5 मुलांचा समावेश असणे, विषबाधेचे कारण अजूनही स्पष्ट झालेले नसून शिळया अन्नातून विषबाधा झाल्याचा निर्माण झालेला संशय दि. 17 ऑक्टो. 2016 रोजी सायंकाळी विद्यार्थ्यांना दिलेल्या वरणभात, डांगर, बटाटयाच्या अन्नातूर विद्यार्थ्यांना पोटात मळमळ होऊ लागल्याने उपचारार्थ टोकावडे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात येणे, शासनाच्या आरोग्य तपासणी पथकाकडून या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केली जात नसल्याच्या आरोप पालकांकडून केला जात असणे , या आश्रमशाळेत गत पाच वर्षापासून अधिक्षिकेची जागा रिक्त असणे, शाळेचे मुख्याध्यापक व प्रभारी अधिक्षक यांच्या बेजबाबदारपाणामुळेच अशी घटना घडल्याचा आरोप होणे, या घटनेची चौकशी करण्याची पालकांनी केलेली मागणी, त्यामुळे पालकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करवयाची कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया" | आदिवासी विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| 14. | " गत आठ महिन्यांपासून घाऊक बाजारात कांदा कमाल आठ ते किमान तीन रुपये किलोपर्यंत घसरुनही शासनाने कोणतीच उपाययोजना न करणे, दोन महिन्यापुर्वी शासनाने जाहिर केलेले प्रतिकिलोला अवघे एक रुपयांचे अनुदानही अद्याप शेतकऱ्यांच्या हाती पडलेले नसणे, उन्हाळी कांदा विक्रीतून उत्पादन खर्चही न निघाल्याने खरीप व खरीपाच्या लागवडीसाठी अनेकांकडे पैसे नसणे, जिल्हा बँक व सोसायटी कर्ज देण्यास तयार नसणे, यामुळे विहिरीत पाणी असूनही नव्याने लागवड करताना अनेक शेतकऱ्यांची दमछाक होणे, याचे परिणाम नव्याने येणारे उत्पादन आणि बाजार भावावर होणे, पाच ते सहा महिन्यांपासून कांद्याचे उत्पादन घेणारा शेतकरी भरडला जात असूनही शासनाची त्यांना मदत देण्याची मानसिकता नसणे, याबाबत कांदा उत्पादन शेतकऱ्यांमध्ये पसरलेला कमालीचा संताप, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया" | सहकार, पणन व वस्त्रोद्योग (पणन) विभाग |
| 15. | " जिल्हाधिकारी, जळगाव यांनी आधार नोदंणी मोहिमे दरम्यान जळगाव जिल्ह्यातील निवासी आश्रमशाळांच्या हजेरी पटावरील हजारो विद्यार्थ्यांची नोंदणी बनावट तसेच अन्य राज्यातील रहिवाशांचे नावे करुन शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातील 65 ते 70 कोटी रुपयांचा अपहार संस्थाचालकांनी केल्याचे निर्दशनास येणे, सदर अपहार झाल्याची कबुली दिल्याचे उघडकीस येणे, अनुदानित निवासी आश्रमशांळाच्या हजेरी पटावर असलेल्या 25,922 विद्यार्थ्यांपैकी 8177 पेक्षा जास्त नावे बनावट सापडल्याचा लेखी अहवाल जळगाव जिल्हा प्रशासनाने शासनाला सादर करुनही तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी सदर घटनेमध्ये तथ्य आढळल्याचे कबुल करुनही शासनाने संबंधित संस्थाचालकांविरोधात अद्यापी कोणतीही कारवाई न केल्यामुळे जनतेमध्ये पसरलेला असंतोष, प्राथमिक सर्वेक्षणामध्ये सरकारी अनुदान प्राप्त 559 शाळांमधील 30 ते 40 टक्के विद्यार्थी बोगस असल्याचे उघ्डकीस येऊनही या गंभीर प्रकाराची दखल अद्यापी शासनाने न घेतल्यान, | समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग |

| | | |
|---|---|---|
| | शासनाच्या हेतुबद्दल निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | |
| 16. | " नवी मुबंई खारघर सेक्टर 10 मधील, 'पुर्वा डे-केअर प्ले स्कुल' या पाळणाघरात, मुलांशी निगा राखण्यासाठी ठेवलेल्या, अफसाना शेख या आयाने, 10 महिन्याच्या बाळाला अमानुषपणे मारहाण केल्याचे दि. 21.11.2016 रोजी उघडकीस येणे, आई-वडील दोघेही नोकरी करीत असल्यामुळे, सदर बाळाला पाळणाघरात ठेवण्यात येत असणे, सदर प्रकरण सीसीटिव्ही द्वारे निर्दशनास आल्यावर, बाळाच्या आईने दि. 23.11.2016 रोजी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात येऊनही, पोलीसांनी आरोपी विरुद्ध ठोस कारवाई न करणे, पिडीत बाळास उपचारासाठी नवी मुबंईतील हिरानंदनी फोर्टीस रुग्णालयात दाखल केले असता, फ्रॅक्चर असल्याचे आढळून येणे, सदर पाळणाघरात इतर बाळांबरोबर देखील असाच प्रकार होण्याची शक्यता असणे, यामुळे पाळण्याघरांमध्ये मुलांच्या संगोपणाबाबत निर्माण झालेली अविष्वासाची भावना, परिणामी मुलांना पाळणाघरात ठेऊन नोकरी करणाऱ्या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, राज्यातील सर्व पाळणाघरांमध्ये बाळांची निगा, संगोपन व सुरक्षा उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाने प्ले स्कुलबाबत धोरण बनवून त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, देणाऱ्या पाळणाघराची नोंदणी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | गृह विभाग |
| 17. | ता.वसई (जि.पालघर) सातवली गावात सुमारे 15 किलो आरडीएक्स स्फोटकांचा साठा मुंबईच्या दहशतवादीविरोधी पथकाने, दि. 27.11.2016 रोजी जप्त करण्यात येणे, सदरहू स्फोटकाचा साठा सापडल्यामुळे, मुंबईसह राज्यात भितीचे व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होणे, तसेच तारापूर अणुऊर्जा प्रकल्प व अतिरेक्यांच्या रडारवर असलेल्या, मुंबई शहरास निर्माण झालेला गंभीर धोका, सदरहू पालघर तालुक्यात, राष्ट्रीय महामार्गालगत आदिवासी व खासगी जमीनीवर | गृह विभाग |

| | | |
|---|---|---|
| | मोठया प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार स्थानिक सरकारी यंत्रणेच्या संगनमताने अद्यापही सुरु असणे, यामुळे येथील गोदामांचा घातपाती कारवायांसाठी वापर करण्यासाठी शक्यता असणे, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, यामुळे मुंबईसह राज्यातील जनतेत निर्माण झालेले असुरक्षिततेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | |
| 18. | " मुंबई ठाणे, मीरारोड, नालासोपारा, वाशी, पनवेल, पेणे आदि ठिकाणी 400 हून अधिक बोगस कॉलसेंटर सुरु असून या कॉलसेंटरच्या माध्यमातून अमेरिकेसह इतर देशातील नागरीकांची टॅक्स डिफॉल्टर, ऑनलाईन लॉटरी अशा विविध कारणाच्या नावाखाली सर्रास फसवणूक सुरु असल्याची माहिती खुद्द अमेरिकन दूतवासाने ठाणे आयुक्तालय, ठाणे ग्रामीण आणि ठाणे पोलीसांना माहे ऑक्टोबर, 2016 मध्ये देण्यात येणे, तसेच मीरारोड येथील बोगस कॉलसेंटर प्रकरणी ठाणे गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नुकतीच मुंबईस्थित अमेरिका दूतवासाला भेट देऊन फसवणूक झालेल्या नागरीकांची माहिती घेण्यात येणे, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातून बोगस कॉलसेंटर मधून होणाऱ्या फसवणूकीबाबत तातडीने माहिती घेऊन सदर बोगस कॉलसेंटरवर तातडीने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" | गृह विभाग |
| 19. | "राज्यातील खाजगी विना अनुदानित, अनुदानित शासकीय, महानगरपालिका, जिल्हापरिषदांच्या शाळामध्ये शिक्षकांची नियुक्ती करताना मान्यता दिलेल्या 35 हजार शिक्षकांची मान्यता संशयास्पद असल्याची बाब माहे नोव्हेंबर, 2016 च्या सुमारास उघडकीस येणे, यातील 25 हजार खाजगी विनाअनुदानीत तर 10 हजार शासकीय, जिल्हा परिषदा व महानगरपालिकांच्या शिक्षकांची मान्यता देण्यात आलेल्या प्रकरणांचा समावेश असणे, सदरची भरती करताना दिलेल्या जाहिरातीस ना हरकत प्रमाणपत्र न घेणे, बिंदुनामावलीत अनेक त्रुट्या असणे, या सर्व प्रकरणात शिक्षण विभागातील | शालेय शिक्षण विभाग |

| | | |
|---|---|---|
| | अधिकाऱ्यांच्या संगनमताने व आर्थिक देवानघेवान मधूनच नियमबाहृय मान्यता देण्यात आलेली असणे, या प्रकरणी देण्यात आलेल्या सर्व स्तरावरील मान्यतेची सखोल चौकशी करुन संबंधितांवर फौजदारी कारवाई करणे आवश्यक असतांनासुध्दा शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांत पसरत असलेला असंतोष परिणामी याप्रकरणी तातडीने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका." | |